<u>झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सशुल्क पुनर्वसन योग्य सदनिकेची किंमत निश्चित करण्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२००८/झोपसु-१**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ०७ सप्टेंबर, २०१८.

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र. झोपुधो-०८१०/प्र.क्र. ९६/२०१८/झोपसु-१, दि. १६ मे, २०१८

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ब च्या सुधारित तरतुदीनुसार केंद्र शासनाचे नागरी भागाकरीता सन २०२२ पर्यंत -सर्वासाठी घरे◦ चे उद्दिष्ट विचारात घेवून दि.१.१.२००० च्या संरक्षणपात्र दिनांकानंतरचे, परंतु दि.१.१.२०११ पूर्वीच्या झोपडीधारकाचा निवारा निश्चित करण्यासंदर्भात -सशुल्क पुनर्वसन◦ योग्यता तपासण्यासंदर्भात संदर्भाधिन दि. १६ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये निकष जाहिर करण्यात आलेले आहेत व अशा झोपडीधारकास सशुल्क पुनर्वसन करण्याची कार्यपध्दती देखिल विहित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सशुल्क पुनर्वसन योग्य आढळलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना अशा झोपडीधारकाकडून वसूल करावयाच्या सदनिकेच्या किंमती संदर्भात निकष जाहिर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

<u>**शासन निर्णय :-**</u>

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्रत्येक प्रकल्पाच्या एकूण पुनर्वसन घटकाचा खर्च, प्रकल्पाचे स्थान व प्रकल्पाच्या आकारमानानुसार आणि प्रकल्पात पुरविण्यात येणाऱ्या विविध पायाभूत सुविधांनुसार, वेगवेगळा असू शकतो ही बाब विचारात घेवून, प्रत्येक मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटकातील पुनर्वसन सदनिकेची सरासरी किंमत निश्चित केली जाईल व जाहीर केली जाईल.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी वरीलप्रमाणे पुनर्वसन घटकातील पुनर्वसन सदनिकेची सरासरी किंमत परिगणीत करताना खालील बाबींचा विचार करावा.

**(अ)** प्रकल्पातील पुनर्वसन घटकाच्या एकूण बांधकाम खर्च. (Construction Cost)

**(ब)** प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेल्या अत्यावश्यक व अन्य पायाभूत सुविधांच्या विकासासाठी येणारा एकूण खर्च. ( Infrastructure Cost)

**(क)** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा स्थिर दराचा इतर प्रशासकीय खर्च. (Fixed percentage for other Administration Cost)

३. वरील घटक विचारात घेवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील पुनर्वसन घटकातील पुनर्वसन सदनिकेची प्राथमिक तात्पुरती किंमत (Provisional Cost) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून योग्य प्रकारे जाहीर करण्यात येईल. पुनर्वसन घटकामध्ये अनेक इमारतींचा समावेश असला तरी प्रत्येक इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अशा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देताना त्यासाठी आलेला प्रत्यक्ष खर्च विचारात घेवून पुनर्वसन घटकातील अशा इमारतीतील पुनर्वसन सदनिकेची अंतिम किंमत (Final Cost ) वरील ३ बाबींच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून सुधारितरित्या जाहीर करण्यात येईल.

४. सशुल्क पुनर्वसन योग्य झोपडीधारकांचे तो ज्या झोपडपट्टी क्षेत्रात राहतो त्या क्षेत्रासाठी संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सशुल्क पुनर्वसन करण्यात येत असल्यास पुनर्वसन घटकातील पुनर्वसन सदनिकेची प्राथमिक तात्पुरती किंमत अशा झोपडीधारकास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून कळविण्यात येईल. अशी प्राथमिक किंमत सदनिका वाटप दिनांकाला वा त्यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे संबंधित झोपडीधारकाने भरणा करणे आवश्यक राहील. अशी रक्कम भरणा केल्यानंतर सर्व साधारणपणे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून पुनर्वसन सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा ३ महिन्याच्या मुदतीत देण्यात येईल व कोणत्याही परिस्थितीत पुनर्वसन सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा संबंधित झोपडीधारकास देण्यापूर्वी अशा झोपडीधारकाकडून पुनर्वसनसदनिकेची प्राथमिक किंमत/ अंतिम किंमत / प्राथमिक किंमतीतील फरक (लागू असेल त्याप्रमाणे) भरणा करुन घेण्यात येईल.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडील प्रतिक्षा यादीनुसार सशुल्क पुनर्वसन योग्य आढळलेल्या झोपडीधारकाचे तो राहात असलेल्या झोपडपट्टी क्षेत्राव्यतिरिक्त अन्य झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पुनर्वसन करण्यात येत असल्यास अशा झोपडीधारकाकडून वरील निकषानुसार संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत निश्चित होत असलेली अंतिम किंमत कळविण्यात येईल व ही रक्कम भरणा करण्यासाठी अधिकतम ३ महिन्याची मुदत देण्यात येईल. ही मुदत जास्तीत जास्त ३ महिने कालावधीपर्यंत वाढविण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना असतील. दिलेल्या मुदतीत/ वाढीव मुदतीत पुनर्वसन सदनिकेची अंतिम किंमत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे भरणा करण्याची जबाबदारी संबंधित झोपडीधारकाची राहील. अशी किंमत विहित केलेल्या मुदतीत भरणा न केल्यास अशा झोपडीधारकास करण्यात आलेले पुनर्वसन सदनिकेचे वाटप रद्द करण्यात येईल व त्याचे प्रतिक्षा यादीवरील नांव काढून टाकण्यात येईल.

६. शासन निर्णय दि. १६ मे, २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सशुल्क पुनर्वसन सदनिकेचे नियमन करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार सशुल्क पुनर्वसन योग्य सदनिकेची किंमत निश्चित करणे, ती संबंधित झोपडीधारकास कळविणे व ती झोपडीधारकाकडून वसूल करणे, तत्सम प्रकारचे सर्व कामकाज या स्वतंत्र कक्षाकडून करण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय बृहन्मुंबई, ठाणे व पुणे पिंपरी-चिंचवड क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू राहील. तसेच राज्यातील अन्य ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन झाल्यास अशा क्षेत्रासाठी लागू राहील.

८. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ मधील तरतुदी विचारात घेवून राज्यातील अन्य महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असल्यास अशा क्षेत्रातील पुनर्वसन सदनिकांची किंमत निश्चित करण्यासाठी योग्य त्या फेरफारासह लागू करण्यासंबंधीची कार्यवाही संबंधित नागरी संस्थेचे आयुक्त किंवा मुख्य अधिकारी यांच्याकडून करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०९०७१४४७५०५२०९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Kishor Govind Pathade

Digitally signed by Kishor Govind Pathade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=726d2037f6079adea28b13974a86a161d6bd207d40c09081cda096a0b4bd82a5, serialNumber=57cba7a0612a9f66d82de41da002a8575e53c67104ae2c0b0313b15b530b7544, cn=Kishor Govind Pathade
Date: 2018.09.07 14:51:59 +05'30'

**( कि.गो.पठाडे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व सचिव
३. मा.सभापती, विधान परिषद/मा.अध्यक्ष, विधानसभा
४. मा.विरोधी पक्षनेता विधान परिषद/मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
५. मा.सर्व विधानसभा आणि विधान परिषद सदस्य
६. मुख्य सचिवांचे सह सचिव
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
९. महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१०. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ,
११. सर्व महानगरपालिका आयुक्त,

१२. महानगर आयुक्त, मुंबई महानगर व प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई

१३. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई/ पुणे-चिंचवड क्षेत्र / नागपूर / ठाणे.

१५. विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

१६. सर्व विभागीय महसूल आयुक्त,

१७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.

१८. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगरे जिल्हा

१९. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर/पश्चिम उपनगर/पूर्व उपनगरे

२०. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

२१. गृहनिर्माण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी

२२. निवड नस्ती (झोपसु-१).

---